I J R S S I S,Issue (VIII), Vol. II, Jan 2023 : 562-567
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# महिलांची राजकिय प्रतिनिधित्वमधील विविधता, सत्ता, राजनिती आणि निर्णय घेण्याची क्षमता

विणा एस. काकडे
आठवले समाजकार्य महाविद्यालय, चिमूर, जि.चंद्रपूर
*Corresponding Author :- veenakakde15@gmail.com

| Communicated : 02.01.2023 | Revision :08.01.2023<br>Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023 |
|---|---|---|

**सारांश :-**
५० टक्के महिला आरक्षणामुळे स्त्रियांना विकासाची संधी प्राप्त होत आहे व स्त्रियांचा विकास होऊन सक्षमीकरण होईल व पर्यायाने देशाचा विकास होईल. त्यासाठी शासनाने व समाजाने उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यात आरक्षण धोरण सक्तीने राबविणे, राजकारणाप्रती संरक्षण व जागरूक करणे, वैचारिक परिवर्तनास संधी प्राप्त करून देणे, राजकीय वातावरण स्वच्छ व निर्मळ ठेवणे, स्त्रियांना मान, सन्मान व दर्जा प्राप्त करून देणे, स्वस्थ व सकारात्मक सामाजिक संरचना निर्माण करणे, आर्थिक आत्मनिर्भरता, महिलांकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक ठेवणे, सुरक्षेची व्यवस्था, प्रत्येक संस्थेमध्ये महिलांची आरक्षीतता, अशा उपाययोजना करून महिलांना थोडया प्रमाणात सहकार्य केल्यास निश्चितच महिलांना आरक्षण देण्याचा व राजकीयदृष्टया सक्षम होण्याचा निर्णय घेण्याचा व राजकीय भुमिकेमध्ये आपला ठसा उमटविण्याचा प्रयत्न होईल. पर्यायाने एका घराचा, कुटूंबाचा, समाजाचा, राज्याचा व देशाचा विकास निश्चितच होईल.

**बिजशब्द :** ़वतकेरू स्त्रि शिक्षणाची चळवळ स्त्रि-संघटना राखीव जागा राजकीय आरक्षण.

**प्रस्तावना :**

जगातील एकुण लोकसंख्येचा विचार केला तर अर्धी लोकसंख्या ही महिलांची आहे. परंतु जगातील कोणत्याही देशात पुरूष समान अधिकार आणि विकासाच्या संधी महिलांना दिल्या जात नाही. विकसनशिल राष्ट्रामध्ये सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय परिस्थिती स्त्रियांच्या विकासाकरीता अनुकूल नसून स्त्रिया परंपरागत रूढी आणि नियमांनी बांधलेल्या आहेत. विकसीत राष्ट्रामध्ये सर्व प्रकारची आधुनिकता असूनही स्त्रियांना समान दर्जा देण्यात येत नाही.

भारतात तर अनेक शतकापासून महिला दुर्लक्षीत राहील्या आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्याच्या चळवळीत महात्मा गांधीच्या आव्हानाने अनेक स्त्रिया सहभागी झाल्या होत्या. म्हणजेच भारतात स्त्रियांचा राजकारणातील सहभाग हा स्वातंत्र्य लढयातील सहभागामुळेच झाला. १९२१ ला भारतात स्त्रियांच्या संपत्तीच्या आधारावर मतदानाचा अधिकार मिळाला. १९२७ ला स्त्रियांनी कायदेमंडळाची सदस्य म्हणून मान्यता मिळविली पण दुर्दैवाने एकही स्त्री कायदे मंडळात निवडून येऊ शकली नाही. त्यामुळे मद्रास प्रांताने मुख्यमंत्री रेड्डी यांना कायदेमंडळात नियुक्त सदस्य म्हणून स्थान दिलो. १९३६ च्या प्रांतिक कायदेमंडळाच्या ५४ स्त्रिया निवडून आल्या त्यामध्ये सामान्य क्षेत्रातून ८ तर आरक्षीत महिला निर्वाचन

क्षेत्रातून ४८ महिला निवडून आल्या होत्या. विजयालक्ष्मी पंडीत यांना उत्तरप्रदेशात मंत्रीमंडळात मंत्री म्हणून तर नागपूरच्या अनुसयाबाई काळे यांना मध्यप्रदेश सरकारमध्ये उपाध्यक्ष तर मुंबई सरकारमध्ये हंसा मेहता यांना सचिव म्हणून नियुक्त करण्यात आले होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५० मध्ये संविधानाने सर्वांना मतदानाचा समान हक्क दिला व त्यामुळे २१ वर्षावरील सर्वच महिलांना मतदानाचा हक्क मिळाला.

संसदेत महिलांच्या सहभागाचा विचार केला तर १९५२ च्या पहिल्या निवडणुकीत वर्षात महिला सदस्य संख्या ही फक्त २२ व याचे शेकडा प्रमाण ४.४ टक्के इतके होते. १४ एप्रिल २०११ मध्ये स्त्रियांना ५० टक्के राजकीय आरक्षण प्राप्त झाले आणि स्त्रियांचा राजकारणात सहभाग वाढला. राजकारणात स्त्रियांना स्थान देणे क्रमप्राप्त होते. देशाची आधारशिला असलेली स्त्री ही वंचीत राहील्याने देश विकासात एकच बाजू पुढे जात होती. परंतू दुसरी बाजू मात्र लंगडी असल्याने मागे खेचत होती, त्यामुळे देश विकासाचा रथ पुढे जातच नव्हता. स्थानिक दोन्ही चाक समान आणण्यासाठी, स्त्रियांना सक्षम करण्यासाठी, विकसीत करण्यासाठी त्यांना ५० टक्के महिला आरक्षण बहाल करण्यात आले. परंतू या आरक्षणाचा स्त्रियांना फायदा होईल काय? आरक्षणामुळे स्त्रियांमध्ये परिवर्तन होईल काय? स्त्रिया सक्षम होतील काय? याचा विचार करावा लागेल म्हणून सदर लेखामध्ये परिस्थितीचा आढावा घेण्यात आलेला आहे.

स्त्रि शिक्षणाची चळवळ, स्त्रि-अत्याचार विरोधी चळवळ, स्त्रि-मुक्ती चळवळ अशा अनेक रूपात भारतातील स्त्रि-चळवळ येथील समाज जीवनावर आपला ढसा उमटविण्याचा प्रयत्न करीत होत्या व आजही आहेत. चळवळीचा व राजकीय प्रतिनिधीत्वात एक टप्पा नेमका कुठे संपतो व दुसरा नेमका कुठे सुरू होतो हे खात्रीने सांगणे कठीण असले तरीही स्त्रि चळवळीचे व राजकीय प्रतिनिधीत्वाचे काही टप्पे दाखविता येऊ शकतात.

स्वातंत्र्य चळवळीतील सहभागामुळे स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत स्त्रियांचे राजकीय व नागरी हक्क आपोआपच अंतर्भूत झाले आहे. स्त्रि-सामर्थ्यशालीतेच्या योजनांचा भाग म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थातील राखीव जागातून वीस लाखाहून अधिक स्त्रिया देशभरात निवडून आल्या. राजकारणात स्त्रियांसाठी राखीव जागा निर्माण झाल्यानंतर वस्तूत: स्त्रि-चळवळ व पक्षिय राजकारणातील स्त्रिया यात सुसंवाद निर्माण होण्याची गरज आज वाढलेली दिसून येते. राजकीय सहभागामुळे स्त्रियांच्या सामाजिक सुधारणेच्या चळवळीला गती मिळाली. भारतीय राज्यघटनेने स्त्रिला समानता देण्यासाठी केवळ समान संधी

नव्हे, तर विशेष संधी दिली पाहीजे अशी तरतूद केली आहे.

संसदेत महिलांच्या संख्येवर आधारीत भारताच्या विश्वामध्ये ६५ वा स्थान आहे व आशिया खंडात अकारावा स्थान आहे. १९५२ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाव्दारे आयोजीत ''महिलांचे राजकीय अधिकार'' यावर विश्व स्तरीय संम्मेलनात पहिल्यांदा महिलांच्या अधिकाराची घोषणा केली गेली व त्याची परिनिती म्हणजे आज केंद्र सरकार, राज्य सरकार व त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांचा अंतर्भाव तसेच विभिन्न राजकीय दलामध्ये स्त्रियांचा सहभाग, त्यांचे प्रतिनिधीत्व, त्यांची सत्ता, त्यांची राजनिती आणि स्त्रियांची निर्णय घेण्याची क्षमता आपणास दिसून येते.

१९०४ मध्ये स्त्रि-संस्थांना एकत्र आणण्याचा प्रयत्न मुंबईत भरलेल्या अखिल भारतीय महिला परिषदेने झाला. अध्यक्षस्थानी रमाबाई रानडे होत्या. पुढे १९२६ मध्ये अखिल भारतीय महिला परिषद पुण्यात स्थापन झाली. स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रिया 'महिला परिषदेशी' फटकूनच वागत असत. परंतू या संघटनेचे महत्व ओळखून सरोजनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय, रामेश्वरी नेहरू यांनी पुढे संघटनेची सुत्रे हाती घेतली. १९३७ साली राष्ट्रसेविका समिती ही हिंदूत्ववादी विचारांची स्त्रि-संघटना स्थापन झाली. १९५४ मध्ये भारतीय महिला फेडरेशन ही साम्यवादी विचारांची स्त्रि-संघटना स्थाना झाली. सन १९७५ मध्ये हे वर्ष संयुक्त राष्ट्रानी ''जागतिक महिला वर्ष'' म्हणून जीर केल्यानंतर आधुनिक पाश्चात स्त्रिवादी विचारांचा आणि चळवळीचा भारतातील स्त्रियांना परिचय झाला. आपल्याकडे स्त्रि-वाद हा शब्द फारसा प्रचलित नव्हता. स्त्रि-मुक्ती चळवळ असाच शब्द आजही अधिक परिचीत आहे. सन १९७५ पासून भारतातील स्त्रि-चळवळ अनेक अंगानी फुलत गेलेली आहे.

भारतातील स्त्रि-चळवळीच्या वाटचालीपेक्षा पाश्चात स्त्रि-चळवळीचा मार्गक्रमन वेगळयारितीने झाला आहे. भारतातील स्त्रि-चळवळीला पुरूष समाज सुधारकांचे बहुमोल योगदान, स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग आणि अलिकडच्या काळात स्त्रियांच्या सामर्थ शिलतेसाठी राजकारणात राखीव जागा हे महत्वपूर्ण संदर्भ असल्यामुळे पाश्चात्य स्त्रि-चळवळीपेक्षा भारतीय स्त्रि-चळवळीचे अग्रक्रम आणि शैली खुपच वेगळी राहीलेली आहे. स्त्रियांच्या विविध हक्कांसाठी कडवे लढे देण्याची गरज भारतातील स्त्रियांना भासली नाही. स्वातंत्र्यकाळातील स्त्रि सहभागामुळे स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत स्त्रियांचे राजकीय व नागरी हक्क आपोआपच अंतर्भूत झाले. डॉ. बाबासाहेबांचे यात मोलाचे योगदान आहे. १९७५ ते १९९० या काळात स्त्रिवादी चळवळीची

चढती कमान राहीली. स्त्रिवादी चळवळीची व्याप्ती शहरापूरती मर्यादीत असली तरी प्रसारमाध्यमातून स्त्रि-प्रतिमा खेडोपाडी पोहचली होती. १९७७ च्या जानेवारी मध्ये 'बायजा' व्दैमासिकांची सुरवात मुख्यत: पुरोगामी महिला संघटनेने याची जबाबदारी घेतली. परंतू स्त्रि-मुक्ती संघटना, लाल निशान पक्षाच्या स्त्रि-कार्यकर्त्या, पुढे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांनीही या उपक्रमाला पाठींबा दिला.

राजकीय विचारप्रणालीच्या पटलाच्या उजव्या टोकापासून ते अगदी डाव्या टोकापर्यंत सर्व राजकीय पक्ष पुरूषसत्ताक पक्षक आहेत. काही पक्षाच्या शिरोभागी सध्या ममता बॅनर्जी, जयललिता, मायावती, लक्ष्मीपार्वती, सोनिया गांधी या स्त्रिया विराजमान असल्या तरीही पक्षाच्या संघटनांची संस्कृती मात्र पुरूष सत्ताकच आहे. लोकसभा, विधानसभात स्त्रियांसाठी राखीव जागांना पाठींबा घोषीत करायचा आणि पक्ष संघटनेत स्त्रियांचा सहभाग वाढविण्याची जी बाब पुर्णपणे आपल्या अख्यारीत आहे तेथे गुणवत्तेचा निकश पुढे करायचा अशा विसंगतीमुळे स्त्रियांसाठी राखीव जागांसाठी असणारा त्यांचा पाठींबा किती प्रामाणिक आणि किती डावपेचात्मक असा प्रश्न निर्माण होतो.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राजनिती मध्ये अनेक लोक आले व वेळेसोबत निघूनही गेले पण यासर्व राजनितीक लोकांमध्ये काही महिला अशा होत्या की त्यांची छाप आजही विसरता येत नाही. त्यामध्ये प्रामुख्याने श्रीमती इंदिरा गांधी यांचे नाव घेण्यात येते. राजकीय क्षेत्राच्या व्यक्तीरिक्त इतर लोकांमध्ये 'मॅडम' आणि 'मिसेस गांधी' या नावाने ओळखली जाणारी अशी एक लोकप्रिय नेता होती की जीचा प्रभाव आजही दिसून येतो. इंदिरा गांधीनी गुट-निरपेक्ष आंदोलनातील भुमिका वाखाण्याजोगी आहे. आपल्या लोकप्रियतेमुळे १९५९ मध्ये इंदिरा गांधी कॉग्रेसच्या अध्यक्षस्थानी बिनविरोध निवडून आल्या व त्यानंतर त्यांच्या दृढसंकल्पनेतून त्या निर्वीवाद नेत्या बनल्या. चीनच्या हल्ल्यामध्ये आपले सर्व दागीने त्यांनी दानामध्ये दिले. यामध्ये इंदिरा गांधीनी जे महान काम केले, नेतृत्व केले ते कधिही विसरता कामा नये. आज भारतात महिला राजनिती अशा दोहऱ्या रस्त्यावर उभी आहे त्यात श्रीमती इंदिरा गांधीचे नाव एक चमत्कारीक व्यक्तीमत्वामधील राजनितीक महिलांना दिशा देण्यास व प्रोत्साहीत करण्यास प्रवृत्त करीत आहे.

सद्यस्थितीचा विचार करता भारतात अनेक महिला राजकीय प्रवाहात स्वत:ला झोकुन देत आहेत. त्यात काही महिलांचा विचार करता पश्चिम बंगाल मधील ममता बॅनर्जी, दिवंगत जयललिता, मायावती सोबत स्व. सुषमा स्वराज याहीपेक्षा आजच्या अर्थमंत्री निर्मला सिताराम यांची राजकीय

कारकिर्द तसेच भारताच्या पहिल्या राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचे त्यांच्या निर्णय क्षमतेवर, प्रभावी व्यक्तीमत्वावरील छाप व लोकांमध्ये विश्वास इ. बाबतीत राजकीय क्षेत्रातील कारकिर्द वाख्याण्याजोगी आहे, प्रभावीत करणारी आहे.

सरकारी आकडेवारीनुसार भारतात जन्म घेणाऱ्या प्रत्येक १०० मुलींमध्ये प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या ही ६७ टक्के एवढी आहे. ४९ टक्के मुली हया मिडलस्कुल मध्ये तर ७ ते ८ टक्के मुली विद्यापीठीय शिक्षण घेत आहेत. परंतू आजही प्रत्येक शैक्षणिक क्षेत्रात निवडणुक लढणे व जिंकणे हाच एकमेव पर्याय आजही खुला आहे पण यासाठी आवश्यक आहे संपत्ती व बाहुबलाची व आजही ही सर्व सत्ता पुरूषांच्या आर्थिकदृष्टया व आत्मनिर्भरतेत कमी पडत आहेत. त्यामुळे त्यांच्यासाठी निवडणुक प्रक्रियेत त्या मागे पडत आहेत. राजकारणात काम करणाऱ्या महिलांमध्ये आरक्षणामुळे परिवर्तन घडून येत आहे. त्यांना प्रत्यक्ष निर्णय प्रक्रियेत स्थान, नेतृत्व विकास, राजकारणाची संधी इत्यादीसाठी कुटूंब, समाज पक्ष इ. पाठबळ मिळाल्यास निश्चितच देशाला फायदा होईल व आरक्षणामुळे देशाला महिला विकास व देशविकास प्राप्त होईल.

आरक्षणामुळे निश्चितच महिलांचा राजकारणात प्रवेश १०० टक्के वाढला आहे. कारण आरक्षण सक्तीचे असल्यामुळे आरक्षीत जागेवर कुणालाही बसविता येत नाही किंवा ते हस्तांतरीत होत नाही त्यामुळे केवळ आरक्षणामुळे का होईना महिलांचा राजकारणात सहभाग वाढला आहे. आरक्षणामुळे महिला सक्षमीकरणात, निर्णय क्षमतेत व भुमिकेमध्ये वाढ होत आहे. महिलांनी राजकीय सहभाग वाढविल्यामुळे त्यांच्यात वैयक्तिक परिवर्तन, कौटूंबिक परिवर्तन, सामाजिक परिवर्तन, राजकीय, आर्थिक परिवर्तन हळूहळू का होईना होत आहे व त्याचा प्रभाव महिला सक्षमीकरणावर होत आहे. गरज आहे त्यांना पुरूषाच्या मदतीची, संधीची, निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेण्याची, कौटूंबिक जबाबदारीतून मुक्त करण्याची, शैक्षणिक पात्रता उंचावण्यी, संधी देण्याची स्त्रि–पुरूष समानता प्रदान करण्याची.

**सारांश :–**

५० टक्के महिला आरक्षणामुळे स्त्रियांना विकासाची संधी प्राप्त होत आहे व स्त्रियांचा विकास होऊन सक्षमीकरण होईल व पर्यायाने देशाचा विकास होईल. त्यासाठी शासनाने व समाजाने उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यात आरक्षण धोरण सक्तीने राबविणे, राजकारणाप्रती संरक्षण व जागरूक करणे, वैचारिक परिवर्तनास संधी प्राप्त करून देणे, राजकीय वातावरण स्वच्छ व निर्मळ ठेवणे, स्त्रियांना मान, सन्मान व दर्जा प्राप्त करून देणे, स्वस्थ व सकारात्मक सामाजिक संरचना निर्माण करणे, आर्थिक

आत्मनिर्भरता, महिलांकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक ठेवणे, सुरक्षेची व्यवस्था, प्रत्येक संस्थेमध्ये महिलांची आरक्षीतता, अशा उपाययोजना करून महिलांना थोडया प्रमाणात सहकार्य केल्यास निश्चितच महिलांना आरक्षण देण्याचा व राजकीयदृष्टया सक्षम होण्याचा निर्णय घेण्याचा व राजकीय भुमिकेमध्ये आपला ठसा उमटविण्याचा प्रयत्न होईल. पर्यायाने एका घराचा, कुटूंबाचा, समाजाचा, राज्याचा व देशाचा विकास निश्चितच होईल.

**संदर्भ :–**

चोरमारे विजय, स्त्रि सत्तेची पहाट, कोल्हापूर, एक्सप्रेस प्रकाशन, हाऊस

हारदारे अन्नासाहेब, भारतीय संसदेतील महिलांचा सहभाग एक दृष्टीक्षेप, योजना मासीक २००५

डॉ. पाटील व्ही.बी., महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक संस्था, पुणे, के. सागर प्रकाशन

दातार छाया (१९९०), महाराष्ट्रातील नवी स्त्रिमुक्ती चळवळ

पंडीत चंद्रशेखर (१९९६), एक युग का अंत: इंदिरा गांधी, दिल्ली लोकभारती प्रकाशन, इलाहाबाद-१

नानीवडेकर मेघा, महाराष्ट्रातील स्त्रि चळवळीचा मागोवा, पुणे, प्रतिभा प्रकाशन

Mrudula B., (1998), Wioman in India : Some Issues, New Delhi

Sinha Anjali Maitra, (1998), Woman in a Changing Society, Delhi